EXTRA ORDINARY GENERAL MEETING OF THE EQUITY AND PREFERENCE SHAREHOLDERS OF THE COMPANY

(Pursuant to the order dated 20th February, 2020 and 11th June, 2020 of the Hon'ble National Company Law Tribunal, Mumbai Bench)

Date: Thursday, 2nd July, 2020

Time: 11.00 am. (IST)

Mode and Deemed Venue: Through Video Conferencing Facility (CISCO WebEx),
At post Pimpali, Tal- Baramati, Dist-Pune-413102

Corporate Participants:

1) Mr. Rajendra D. Pawar : Chairman and Managing Director
2) Mrs. Vijaya Hiremath: Independent Director
3) Mr. Subhash Gulve: Executive Director
4) Mr. Subhash Kore: CFO
5) Mr. Devendra Kulkarni: Company Secretary

Auditors:

1) CA Suhrud Lele, Partner, Kirtane & Pandit LLP

Scrutinizer:

1) CS Hrishikesh Wagh: Partner, KANJ and Co. LLP

- **Welcome Address – Mr. Devendra Kulkarni**

नमस्कार, मी देवेंद्र कुलकर्णी, आपल्या बारामती ऍग्रो संस्थेचा कंपनी सचिव, पुन्हा एकदा या विडिओ कॉन्फरन्सिंग मीटिंगद्वारे जमलेल्या सभासदांचे स्वागत करतो आणि आपले आदरणीय चेअरमन साहेब, आपले डायरेक्टर आदरणीय आबा आणि विजय मॅडम यांचेही स्वागत करतो तसेच आपले सी. ओ. ओ. बाबासाहेब, आणि सी. एफ. ओ. कोरे साहेब यांचेसुद्धा या सभेसाठी स्वागत करतो.

सभेसाठी आवश्यक असणारी सभासदांची संख्या म्हणजेच कोरम हा उपस्थित आहे त्यामुळे आपण सभेचे कामकाज सुरु करत आहोत.

दहा दिवसापूर्वी, दि. २० जून २०२० रोजी, आपल्या कंपनीचे नवीन ऑडिटर कीर्तने पंडित यांच्या नियुक्तीसाठी विशेष सर्वसाधारण सभा या पद्धतीने आयोजित करण्यात आली होती.

परंतु आजची सभा हि नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल, मुंबई, जे कि एक कोर्ट आहे त्यांच्या आदेशानुसार घेत आहोत. आधी हि सभा, कोर्टाच्या आदेशानुसार दि. २६ मार्च, २०२० रोजी आयोजित करण्यात आली होती. सभेची नोटीस ही सभासदांना मार्च महिन्या मध्ये पाठवण्यात आली होती परंतु लॉक डाउन मुळे हि सभा वारंवार स्थगित करण्यात येत होती.

कोरोनाची सद्यस्थिती पाहता, हि सभा विडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे घेण्यात यावी अशी विनंती केल्यावर, कोर्टाने त्यास संमती दिली होती. त्या अनुषंगाने आजची ही सभा आयोजित करण्यात आली आहे.

सदर सभे संदर्भात काही शंका असल्यास कृपया सभासदाने चाट बॉक्स मध्ये प्रश्न पाठवावे तसेच मीटिंगच्या शेवटी आपण काही कालावधी हा प्रश्नासाठी ठेवणार आहोत.

सदर सभेची माहिती, चेअरमन साहेब आपल्याला देणार आहेत त्या करिता मी चेअरमन साहेबांना विनंती करतो कि त्यांनी या सभे विषयी सभासदांनां संबोधित करावे.

- **Chairman's Speech – Mr. Rajendra D. Pawar**

नमस्कार, या विडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे सभेसाठी जमलेल्या सर्व सभासदांचे पुन्हा एकदा, स्वागत. जसे आपल्या कंपनी सचिवांनी सांगितले की दहा दिवसापूर्वी आपल्या कंपनीचे नवीन ऑडिटर, कीर्तने पंडित यांच्या नियुक्तीसाठी विशेष सर्वसाधारण सभा या पद्धतीने आयोजित करण्यात आली होती.

आजच्या सभेचे नियोजन, हे नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल, मुंबई कोर्टाच्या आदेशानुसार केलेले आहे. याचे कारण, आपल्या कंपनीने, कंपनी कायदा २०१३ च्या कलम २३० ते २३२ च्या अंतर्गत, प्रोट्रांस सप्लाय चैन मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड आणि ॲगवेट जेनेटिक्स प्रायव्हेट लिमिटेड या दोन ग्रुप कंपनींचे बारामती ॲग्रो लिमिटेडमध्ये विलीनीकरणासाठी तसेच कंपनीच्या भागभांडवल रचनेमध्ये काही बदल करण्यासाठी नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल, मुंबई कोर्टामध्ये योजना सादर केली होती.

ह्या योजनेनुसार, कंपनीचे सभासद, ज्यांच्याकडे २५० किंवा त्यापेक्षा कमी इक्विटी शेअर्स असतील त्यांचे इक्विटी शेअर्सचे ट्रान्सफर हे प्रेफरेन्स शेअर्स मध्ये होणार आहे आणि त्यावर कंपनी, सभासदांना ९ % डिविडेंड देणार आहे.

सदर योजनेला, नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल, मुंबई कोर्ट यांच्या आदेशानुसार सभासदांची मंजुरी आवश्यक आहे त्यामुळे ही योजना आपल्यापुढे मांडण्यात आली आहे.

या योजनेला आपली मान्यता मिळावी अशी विनंती आहे.

तसेच सभासदांना विनंती आहे की ज्या सभासदांनी या पूर्वी सदर ठरावासाठी रिमोट ई-वोटिंग द्वारे मतदान केलेले नाही, त्यांनी ह्या सभेनंतर ई-वोटिंग सिस्टिम द्वारे मतदान करावे. या संदर्भातील अधिक माहिती साठी सभेनंतर, त्वरित आपल्या कंपनी चे सचिव श्री. देवेंद्र कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधावा.

पुन्हा एकदा, कंपनीच्या वतीने आपणाकडून वेळोवेळी मिळत असलेल्या सहकार्याबद्दल आणि कायम दाखविलेल्या विश्वासाबद्दल आपले मनापासून आभार व्यक्त करतो.

तुम्हास आणि तुमच्या कुटुंबियास हार्दिक शुभेच्छा..!!!!

- **Voting instructions – Mr. Devendra Kulkarni**

मी सर्व सभासदांच्या वतीने चेअरमन साहेबांचे आभार मानतो आणि सभासदांना सांगू इच्छितो की या योजने संदर्भातील पुढील सर्व प्रक्रिया ही कंपनी कायदाच्या तरतुदी आणि कोर्टाच्या आदेशानुसार होणार आहे. आणि आता जसे चेअरमन साहेबानी सांगितले त्याप्रमाणे ज्या सभासदांनी रिमोट ई-वोटिंग केले नाही त्यांनी एन. एस. डी. एल. च्या वेबसाइट वर जाऊन वोटिंग करावे. वोटिंग ची लिंक चॅट बॉक्स मध्ये देण्यात आलेली आहे.

काही शंका किंवा मदत असल्यास कृपया मीटिंग संपल्या नंतर माझ्याशी किंवा लीगल डिपार्टमेंट च्या प्रमिला मॅडम आणि प्रफुल्ल तावरे यांच्याशी संपर्क साधावा.

सभासदांना काही प्रश्न असल्यास त्यांनी चॅट बॉक्स मध्ये पाठवावे किंवा आता विचारले तरी चालणार आहे

Company Secretary thereafter shared his contact number with the members and questions raised by members regarding venue e-voting were resolved.

Mr. Devendra Kulkarni –

सभेसंदर्भात अजून काही प्रश्न आले नाही आणि त्यामुळे हि सभा संपन्न झाली असे जाहीर करतो. पुन्हा एकदा सर्व सभासदांचे धन्यवाद!

Meeting concluded at: 11:15 AM